# पौल व बर्णबा ह्यांनी नवीन विश्वासणाऱ्यांना नव्या मंडळ्यांमध्ये आणले

**प्रार्थना:** "प्रिय पित्या, आम्ही जाऊन लोकांना तुझा पुत्र येशू याच्याबद्दल सांगतो तेव्हा तुला कसे समाधान मिळते हे आमच्या मुलांना दाखविण्यासाठी कृपा करून ह्या अभ्यासाचा उपयोग करून घे."

मुलांना वयोगट आणि गरजांनुरूप कार्यक्रम निवडा.

## 1. पौल व बर्णबा ह्यांच्याविषयी शिकविण्याची तयारी करा.

पौल व बर्णबा ह्यांनी नव्या मंडळ्या कशा प्रकारे सुरू केल्या ते कृपा करून प्रे. कृ. अध्याय 14 मधून वाचा



पाहा प्रे. कृ. 13:1-3 मध्ये पौल व बर्णबा हे अन्य ठिकाणी नवीन कामासाठी गेले, त्यांना निरोप देण्याकरिता अंत्युखियामधील विश्वासणाऱ्यांनी काय केले (प्रश्नांची उत्तरे खाली दिली आहेत)

1) पौल व बर्णबाला पाठविणारी मंडळी कोणत्या शहरात होती?

2) पवित्र आत्म्याने अंत्युखियातील विश्वासणाऱ्यांना काय करायला सांगितले?

*(उत्तरे:*

*1) अंत्युखिया, सध्या हे ठिकाण तुर्की या देशात आहे.*

*2) पवित्र कामासाठी त्याने पाचारण केले त्याकरिता 'वेगळे करा' त्यांनी जाऊन येशूची सुवार्ता कधीही न ऐकलेल्या लोकांना सांगावी अशी त्याची इच्छा होती).*

पाहा प्रे. कृ. 14:8-23 मध्ये लुस्त्र येथे घडलेल्या गोष्टी:

1) लोकांना आश्चर्य वाटावे असे काय घडले?

2) पौल व बर्णबा हे कोण लोक आहेत असे प्रथम लोकांना वाटले?

3) पौल व बर्णबा ह्यांनी लोकांना त्यांची उपासना करण्यापासून दूर कसे ठेवले?

4) इतर शहरांमधून येऊन लोकांनी चिथावणी दिल्यावर तेथील लोकांनी पौलाला काय केले?

5) पौल व बर्णबा ह्यांनी लोकांना येशूविषयी सांगण्याचे थांबविले का?

6) शिष्यांना पुढारी मिळावेत यासाठी पौल व बर्णबा ह्यांनी तेथून निघून जाण्यापूर्वी काय केले?

*(उत्तरे:*

1) *आपण बरे होऊ असा त्या लंगड्या माणसाचा विश्वास असल्याचे पौलाला दिसले आणि देवाने त्याला बरे केले.*
2) *लोकांना वाटले बर्णबा हा ज्यूपिटर तर पौल हा मर्क्युरी असे देव आहेत*
3) *आम्ही माणसे आहोत आणि जिवंत देवाची सेवा करीत आहोत असे त्यांनी लोकांना सांगितले.*
4) *लोकांनी पौलाला दगडमार केली आणि तो मेला असे समजून त्याला नगराबाहेर ओढून टाकून दिले.*
5) *पौल व बर्णबा ह्यांनी लोकांना येशूविषयी सुवार्ता सांगणे सुरूच ठेवले.*
6) *प्रेषितांनी पुढारीपण करण्यासाठी प्रत्येक नवीन मंडळीवर वडीलनांची नेमणूक केली.)*

शिक्षकांनी किंवा मोठ्या मुलाने पौल व बर्णबा ह्यांनी लुस्र येथील लंगड्या माणसाला बरे केले हा कथावृत्तांत आणि त्यांनतर घडलेले प्रसंग सांगावेत (प्रे. कृ. 14:8–23).

भाग 1 मधून कथावृत्तांतावरील प्रश्न मुलांना विचारा.

प्रे. कृ. 14:8–23 मधून पौल व बर्णबा ह्यांनी काय केले ते नाट्य रूपाने दाखवा. हे नाट्यीकरण उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांसमोर सादर करा. तुम्हांला कथावृत्तांताचे काही किंवा सर्व भाग निवडता येतील. मोठ्या मुलांनी लहान मुलांना तयारी करण्यासाठी मदत करावी.

- मोठ्या मुलांनी पौल, लंगडा माणूस व निवेदक ह्या भूमिका कराव्यात.
- लहान मुलांनी बर्णबा, लोकसमुदाय व दगडमार करणारे लोक ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदक:** वचने 8 व 9 वाचा.

**पौल व बर्णबा** लंगड्या माणसाकडे चालत जा.

**पौल:** "तू येशूच्या नावात बरा झाला आहेस!"

**लंगडा माणूस:** उडी मारून चाला आणि मोठ्याने ओरडा, "मी बरा झालो!",

**लोकसमुदाय:** गुडघे टेकून बसा आणि ओरडून म्हणा, "देव माणसांच्या रूपाने आमच्यात उतरले आहेत!"

"ते ज्युपिटर आणि मर्क्युरी आहेत!"

"माळा व बैल आणून त्यांच्यासमोर बलिदान करा!"

**पौल:** वचन 15 मधील पौलाचे शब्द मोठ्याने म्हणा.

**निवेदक:** वचने 18 व 19 वाचा.

**दगड मारणारे लोक:** पौल व बर्णबा ह्यांच्याकडे बोट दोखवून संतापाने ओरडा,

"पौल व बर्णबा हे लोक तुमची फसवणूक करतात!"

"ते भुतांच्या सामर्थ्याने तुम्हांला फसवितात!"

"ते तुमचे मंदिर आणि रूढीपरंपरांचा नायनाट करतील!"

ते पौलाला दगडमार करण्याचा अभिनय करतात. तो खाली पडतो.

**निवेदक:** वचने 20–23 वाचा आणि मग नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना:

मुलांनी ही नाटिका प्रौढांसमोर सादर केली असेल तर त्यांनी वर प्रे. कृ. 14 वरील दिलेले प्रश्न मोठ्या माणसांना विचारवेत.

पेरणी करणाऱ्या शेतकऱ्याच्या दृष्टांताचे प्रात्यक्षिक करा. मार्क. 4:1–20

- प्रत्येक मुलाकडे भाताचे दाणे द्या किंवा त्यांना दिसेल अशा प्रकारे धान्य धरा.
- येशूने धान्याचे उदाहरण कसे वापरले, लोकांनी त्याचा स्वीकार केला तसे त्याचे राज्य कसे विस्तारले हे स्पष्ट करा. त्याने सांगितले की आपण चांगल्या जमीनीत दाणा पेरला तर त्याची चांगली वाढ होऊन त्यातून अनेक पट पीक मिळेल.
- चांगल्या आणि वाईट जमिनीतील फरक स्पष्ट करा.
- पौल व बर्णबा लुस्र आणि तर शहरांमध्ये गेले तेव्हा त्यांनी देवाच्या राज्याचे बीज पेरले, हे स्पष्ट करा. नवीन मंडळ्या पुढे येतात आणि इतर ठिकाणी आणखी बीज पेरण्यासाठी सेवकांना रवाना करतात.

कविता चार मुलांनी यशया 42:1,4,6 व 7 यातील प्रत्येकी एक वचन वाचावे.

**पाठ करा प्रे. कृ.** 1:8

**प्रार्थना:** "प्रिय प्रभु, आम्ही इतरांना सुवार्ता सांगताना आम्हाला पौल व बर्णबा ह्यांच्या प्रमाणे विश्वासू व धाडसी असे कर. इतर ठिकाणच्या लोकांना येशू विषयी समजू दे आणि त्यांनी ख्रिस्ताच्या शरीररूपी जागतिक मंडळीचे सदस्य व्हावे असे तू कर."

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net